# दिनांक 05/03/2025

1 वडखळ पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 03/03/2025 रोजी 20:05 वा च्या सुमारास मौजे वडखळ अलिबाग रोडवर धरमतर चेकपोस्टच्या अलिकडे संतोष पार्कींगच्या समोर ता.पेण येथे ट्रेलर क्रमांक एम.एच.48-0405 वरील आरोपी चालक हा आपला ताब्यातील ट्रेलर वडखळ बाजूकडून अलिबाग बाजूकडे भरधाव वेगात अतिवेगाने हयगयीने, रोडच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून चालवित घेवून जात असताना होन्डा कंपनीची स्कुटी क्र जीए/08/एएम/7468 वरील चालक नामे महेश व्यकंट गुडे वय-37 रा.भैरवनाथ पेझारी ता.अलिबाग यास पाठीमागुन ठोकर मारल्याने स्कुटीवरील चालक खाली पडुन ट्रेलरच्या क्लीनर साईड कडील बाजुस पडल्याने ट्रेलरचे चाक स्कुटी चालक याचे डोक्यावरुन जावुन गंभीर दुखापती होवुन रक्तस्त्राव झाल्याने स्कुटी चालक याचे मृत्यूस कारणीभुत झाला तसेच ट्रेलर वरील चालक याने जखमी इसमास औषधोपचार न करता व पोलीसांना अपघाताची खबर न देता अपघात ठिकाणी न थांबता अलिबाग बाजूकडे निघून गेला.

याबाबत वडखळ पोलीस ठाणे येथे गु.र.नं.11/2025 भा.दं.वि.क.106,106(1),281, 125(a),125 (b), मोटार वाहन अधिनियम, 1988 चे कलम 134(A),134(B),184 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सफौ/सुभाष सोनावळे हे करीत आहेत

2. खोपोली पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 12/04/2024 रोजी 10:00 वा ते दि. 04/03/2025 रोजी 10:00 वा च्या दरम्यान मौजे ज्योती स्टील इंडस्ट्रीज प्रा.लि.,होनाड, ता.खालापूर येथे आरोपीत ज्योती स्टील इंडस्ट्रीज प्रा.लि.,होनाड, ता.खालापूर, जि.रायगड चे मालक/ भागीदार/ भोगवटादार यांनी दिनांक 12.04.2024 रोजीच्या पुर्वी ते आतापावेतो त्यांच्या ताब्यातील सर्व्हे नंबर 10/1, 10/3, 10/4, 10/6, 10/11 व 19/8 या जमिनीवर कंपनीच्या वापराकरिता सिक्यूरीटी केबीन, टॉयलेट, वॉटर टँक, शेड 1, शेड , स्ट्रक्चर, स्क्रॅब स्टोअर, शेड-3, टॉयलेट, वॉटर टँक, लेबर कॅम्प, गॅस प्लॉन्ट, स्टोअरेज, ऑफिस, ट्रांन्सफार्मर आणि ट्रांन्सफार्मर (मेन रोड) अशा एकूण 17 ठिकाणी एकूण अंदाजे 16,264.015 चौ.मी. इतके अनधिकृत बांधकाम मंजूर नकाशाच्या अनुसार न करता व कुठल्याही सक्षम प्राधिकरणाकडून भोगवटा प्रमाणपत्र न घेता केल्याचे आढळून आले.

याबाबत खोपोली पोलीस ठाणे येथे गु.र.नं.64/2025, महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगर नियोजन अधिनियम सन 1966 चे कलम 53(6),53(7) प्रमाणे 53(6),53(7) प्रमाणे गुन्हा दाखल

करण्यात आला असून अधिक तपास सपोनि/श्री.सुजित गडदे हे करीत आहेत.

3. खोपोली पोलीस ठाणे हद्दीत दिनांक दि. 29/05/2023 रोजी 10:00 वा ते दि. 04/03/2025 रोजी 10:00 वा च्या दरम्यान मौजे दहिवली तर्फे बोरेटी (पाली फाटा) येथील सर्व्हे नंबर 36/1/2/अ/1 व सर्व्हे नंबर 36/1/2/अ/2 येथे, ता.खालापुर येथे आरोपीत यांने दिनांक 29.05.2023 रोजीच्या पुर्वी ते आतापावेतो मौजे दहिवली तर्फे बोरेटी (पाली फाटा) येथील सर्व्हे नंबर 36/1/2/अ/1 व सर्व्हे नंबर 36/1/2/अ/2 येथे 1) तळमजला, 2) 1 मजला, 3) 2 मजला, 4) 3 मजला, 5) 4 मजला, 6) तळमजला, 7) 1 मजला, 8) 2 मजला व 9) लेबर कॉलनी अशा एकूण 09 ठिकाणी एकूण 1,578.5054 स्केअर मिटर बेकायदेशिर व अनधिकृत बांधकाम श्री.कुणाल रमाकांत पाटील यांनी हॉटेल व्हाईट हाऊस या नावाने तर 1) बांधकाम क्रमांक 01, 2) बांधकाम क्रमांक 02, 3) बांधकाम क्रमांक 03 व 4) बांधकाम क्रमांक 04 अशा एकूण 04 ठिकाणी एकूण 373.3682 स्केअर मिटर असे बेकायदेशिर व अनधिकृत बांधकाम केले.

याबाबत खोपोली पोलीस ठाणे येथे गु.र.नं.65/2025, महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगर नियोजन अधिनियम सन 1966 चे कलम 53(6),53(7) प्रमाणे 53(6),53(7) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सपोनि/श्री.सुजीत गडदे हे करीत आहेत.

4. कर्जत पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 05/05/2022 रोजी 00:00 वा ते दि. 03/03/2025 रोजी 00:00 वा च्या दरम्यान मौजे रोशनी महल, इ विंग, रूम नं.302, मुंब्रा,जि.ठाणे येथे महिला फिर्यादी व 03 आरोपीत हे नात्याने पती, सासू,व सासरे असे आहेत. आरोपीत क्र.01 ते 03 यांनी फिर्यादी यांना मुलबाळ होत नाही या कारणावरून वेळोवेळी टोमणे मारून फिर्यादी यांचा शारीरीक व मानसीक छळ केला तसेच आरोपी क्र.01 याने त्याच कारणावरून फिर्यादी यांना शिवीगाळ करून हाताबुक्यांनी वेळोवेळी मारहाण केली. तसेच फिर्यादी यांचे दोन्ही भाउ यांना बाहेरची मुल पाठवून मारण्याची धमकी दिली.

याबाबत कर्जत पोलीस ठाणे येथे गु.र.नं.56/2025, भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 85,115(2),351(2),352, 3(5) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोना/केशव नागरगोजे हे करीत आहेत.

5. माणगाव पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 04/03/2025 रोजी 13:15 वा च्या सुमारास मौजे कोंडेथर गावच्या हददीत पुणे ते माणगाव रोडवर ताम्हाणी घाटामध्ये ता.माणगाव येथे फिर्यादी रा. .शेणु .ता शेणु. जि परभणी, सध्या रा. खेड आगार रत्नागिरी हे त्याच्या ताब्यातील एस टी बस ही खेड रत्नागिरी ते पिपरी चिंचवड पुणे रोडने ताम्हाणी घाटातुन चालवत घेवुन जात असताना अपघातच्या ठिकाणी आलेवेळी पुणे बाजुकडुन येणारी आरोपी (मयत) त्याच्या ताब्यातील मारुती स्वीफट कार क्र.एम एच 12 एन यु 6731ही आरोपीताने अतिवेगाने,हयगयीने बेदरकारपणे, रसत्याच्या परिस्थीकडे दुर्लक्ष करुन चालवीत आलेवेळी अचानक रॉंग साईडला येवुन समोरील येणारी एस टी बस क्रं- एम एच 20 बी एल 2771 हीस ठोकर लागुन अपघात केला. सदर अपघाता मध्ये आरोपी हा स्वत:चे तसेच सखुबाई तुकाराम कानगुडे यांचे मरणास तसेच कार

मधील असलेले जखमी 1)रुपाली मानस कुमार साहु, वय 28 वर्षे 2) ताराबाई बाळु नलावडे , वय 45 वर्षे, 3) रमा मानस साहु, वय 07 महिने, सर्व रा.शिंदेवाडी ,पौंड पुणे . यांचे मोठया व गंभीर स्वरुपाचे दुखापतीस व दोन्ही वाहनाचे नुकसानीस कारणीभुत झाले.

यााबाबत माणगाव पोलीस ठाणे येथे गु.र.नं.51/2025, मोटार वाहन अधिनियम, 1988 184, भारतीय न्याय संहिता कलम 106(1),281,125 (a),125(b) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई/ राठोड हे करीत आहेत.

6. महाड तालुका पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 02/03/2025 रोजी 02:45 वा च्या सुमारास मौजे चापगाव गावचे हद्दीत रायगड - महाड रोडवर, आदीवासीवाडी राडचे वळणावर ता.महाड येथे फिर्यादी हे त्यांची स्प्लेंडर मो.सा.नंबर एम.एच.06 सी.के.2989 हिचेवर त्यांची 02 मुली मुलगा- असे बसुन महाड ते चापगाव आदीवासीवाडी असा प्रवास करीत असताना रायगड रोडवर आदीवासीवाडीचे वळणावर रोडच्या साईटपट्टीजचळ आले वेळी रायगड बाजुकडुन येणारी सहा सीटर टमटम गाडी नंबर एम. एच. 06 एस. 4418 हिचेवरील आरोपी याने त्याचे ताब्यातील गाडी ही भरधाव वेगात व रस्त्याच्या परिस्थीतीकडे दुर्लक्ष करुन चालवुन फिर्यादी यांचे मोटार सायकलला समोरुन येवुन ठोकर मारून अपघात करुन फिर्यादी यांस व त्यांची मुलगी- निता,मुलगी- योगीता, मुलगा- योगेश असे सर्वांच्या डावे पायाच्या गंभीस व किरकोळ स्वरुपाच्या दुखापती होणेस तसेच मोटार सायकल व त्याचे टमटम गाडीचे नुकसानीस कारणीभुत झाला आहे व तो अपघाताची खबर न देता पळुन गेला.

याबाबत महाड तालुका पोलीस ठाणे येथे गु.र.नं.07/2025, मोटार वाहन अधिनियम, 1988 कलम 184, 134, भा.न्या.संहीता 2023 चे कलम 281,125(अ), 125(ब) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह/बाळासाहेब दाभाडे हे करीत आहेत.

7. महाड एम.आय.डी.सी पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 04/03/2025 रोजी 13:00 वा च्या सुमारास मौजे धामणे येथील फिर्यादी यांचे राहते घरात फिर्यादी यांचे मोबाईल नंबर 7276273674 वर आरोपीत याने कॉल व व्हॉट्सअप मेसेज केले तसेच फिर्यादी हिची आई व बहीण यांना आरोपीत याने कॉल करुन फिर्यादी व साक्षीदार या आरोपीत यास ओळखत नसताना देखील फिर्यादी यांचे मनाविरुध्द जवळीक साधण्याचा उददेशाने विनाकारण वारंवार कॉल व मेसेज करुन फिर्यादी व साक्षीदार यांचे मनास लज्जा उत्पन्न होईल असे वाक्य बोलून संभाषण करुन शिवीगाळी व दमदाटी केली.

याबाबत महाड एम.आय.डी.सी पोलीस ठाणे येथे गु.र.नं.23/2025, भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 78,79,352,351(4) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास मपोह/नीलिमा गायकवाड हे करीत आहेत.

8. रोहा पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 22/02/2025 रोजी 17:50 वा च्या सुमारास मौजे दिवा ते रोहा रेल्वेस्टेशन असा दिवा - रत्नागीरी पॅसें रेल्वेने प्रवास करीत असताना फिर्यादी हे दि. 22/02/2025 रोजी 17.50 वा. ते 20.10 वा. चे सुमारास दिवा ते रोहा रेल्वे स्टेशन असा दिवा -

रत्नागीरी पॅसेंजर रेल्वेने प्रवास करताना फिर्यादी यांचा एकूण 10,000/-रुपये किमतीचा मोबाईल फोन कोणीतरी आज्ञात चोरटयाने स्वताचे फायदयाकरिता फिर्यादी यांचे संमती शिवाय त्यांचे खिशातुन नकळत काढुन चोरून नेला आहे.

याबाबत रोहा पोलीस ठाणे येथे गु.र.नं.37/2025, भा.न्या.सं कलम 303(2) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह/सकपाल हे करीत आहेत.

## वाहतूक केसेस

दिनांक 04.03.2025 रोजी 28 पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतुक शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी वाहतुकीचे नियम भंग करणा-या एकूण 267 इसमावर कायदेशीर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून 2,46,200/-रुपये इतका दंड आकारला आहे.